**ठळक बातम्या**

- राजस्थानात १ लाख २२ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासप्रकल्पांचा प्रधानमंत्र्यांच्या हस्ते प्रारंभ

- लढाऊ विमानांच्या खरेदीसाठी संरक्षण मंत्रालयाचा हिंदुस्तान एअरोनॉटिक्सशी ६२ हजार कोटी रूपयांचा करार

- स्वदेशनिर्मित अग्नी प्राईम क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी

- ISSF कनिष्ठ गट विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत महिलांच्या ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात भारतीय नेमबाजांनी तिन्ही पदकं पटकावली

**आणि**

- आशिया चषक क्रिकेट स्पर्धेच्या अंतिम सामन्यात स्थान मिळवण्यासाठी पाकिस्तान आणि बांगला देश यांच्यात लढत सुरु

**<><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज राजस्थानात बन्सवारा इथं १ लाख २२ हजार कोटी रुपयांच्या विविध विकासप्रकल्पांचं भूमिपूजन तसंच उदघाटन केलं. या प्रकल्पांमध्ये ७०० मेगावॅट क्षमतेच्या आणि ४२ हजार कोटी रुपये गुंतवणुकीच्या माही बन्सवारा राजस्थान अणुऊर्जा प्रकल्पाचा, तसच आरोग्यसेवा, पाणीपुरवठा, सौरऊर्जा इत्यादी प्रकल्पांचा  समावेश आहे. त्याशिवाय त्यांनी राज्यातल्या तीन नवीन रेल्वे स्थानकांच उदघाटन केलं.

राजस्थान एका ऐतिहासिक पर्वाचा साक्षीदार असून राज्यात ९० हजार कोटी रुपयांचे ऊर्जाप्रकल्प सुरु झाल्यामुळे भारताच्या ऊर्जा क्षेत्रात महत्वाचं योगदान देत आहे असं प्रधानमंत्री यावेळी म्हणाले. आधीच्या सरकारने ऊर्जा क्षेत्राकडे दुर्लक्ष केलं होतं परंतु गेल्या दशकात वीजनिर्मिती क्षेत्रात भरीव काम झालं असून स्वच्छ ऊर्जानिर्मिती ही लोकचळवळ झाली आहे असं ते म्हणाले. आत्मनिर्भर भारताचं उद्दिष्ट साध्य करण्यासाठी नागरिकांनी स्वदेशी वस्तूंना प्रोत्साहन द्यावं असं आवाहन त्यांनी यावेळी केलं.

<><><><>

संरक्षण मंत्रालय हिंदुस्तान एअरोनॉटिक्स कडून Mk1A प्रकारची ९७ विमानं खरेदी करणार आहे. त्यासाठी ६२ हजार कोटी रूपयांच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्या असून २०२७ -२८ या वर्षात ही विमानं हवाई दलात दाखल व्हायला सुरुवात होईल. पुढच्या ६ वर्षात सर्व विमानं हवाई दलाच्या ताब्यात येतील. या विमानांमधे ६४ टक्के घटक स्वदेशनिर्मित असतील. याखेरीज उत्तम रडार, स्वयम् रक्षाकवच, आणि इतर अद्ययावत यंत्रसामुग्री आणि उपकरणांमुळे आत्मनिर्भरतेच्या अभियानाला चालना मिळणार आहे. सुमारे १०५ भारतीय कंपन्या यात थेट सहभागी असतील आणि दरवर्षी ११ हजार प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष रोजगार त्यातून मिळेल.

<><><><>

राष्ट्रीय हायड्रोजन मिशन आणि हरित ऊर्जेवर अधिक भर देऊन शून्य कार्बन उत्सर्जन साध्य करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचं प्रतिपादन केंद्रीय बंदरं, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल यांनी केलं आहे. जवाहरलाल नेहरू बंदर प्राधिकरणात इलेक्ट्रिक ट्रकच्या नवीन ताफ्याला आज त्यांनी हिरवा झेंडा दाखवला, त्यावेळी ते बोलत होते. मेक इन इंडिया उपक्रमांतर्गत हरित वाहतुकीला प्रोत्साहन देण्यासाठी केंद्र सरकार सर्व आवश्यक ती पावलं उचलत असल्याचं ते म्हणाले. मेरीटाईम इंडिया व्हिजन २०३०वर सरकार काम करत असून त्यामुळे भारताला जहाजबांधणी क्षेत्रात अव्वल देशांमध्ये स्थान मिळू शकेल असंही सोनोवाल यावेळी म्हणाले.

<><><><>

तंत्रज्ञानाद्वारे बँकिंग सेवा सुधारणं आणि नवकल्पनांना महत्त्व देणं गरजेचं आहे, असं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. त्या आज पुण्यात बँक ऑफ महाराष्ट्रच्या ९१ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. देशाच्या आर्थिक विकासात वित्तीय संस्थांचा महत्त्वाचा वाटा आहे, असं त्या म्हणाल्या. सार्वजनिक क्षेत्रातल्या बँकांनी लघु उद्योगांसाठी युवकांना कर्ज आणि इतर सेवा द्याव्यात, अशी सूचना त्यांनी केली. सीतारामन यांनी बँक ऑफ महाराष्ट्रच्या नवीन औद्योगिक कार्यालयाचं उद्घाटन आणि झेन लाईफ मोबाईल बँकिंग ॲपचं लोकार्पणही केलं.

<><><><>

सेवा पर्व या विशेष मालिकेत आज जाणून घेऊ या संरक्षण निर्यात क्षेत्राविषयी....

\- **- - व्हीसी - -**

*(गेल्या अकरा वर्षात भारताच्या संरक्षण क्षेत्राचं सामर्थ्य वाढलं असून ते आत्मनिर्भर होण्याकडे वाटचाल सुरू आहे. संरक्षण क्षेत्रात तंत्रज्ञानाच्या समावेशासह अनेक क्रांतीकारी बदल झाले आहेत. त्यामुळे उत्पादन झपाट्याने वाढत आहे. यापूर्वी भारताला संरक्षण सामुग्री आयात करावी लागत असे मात्र आता भारत जगातल्या प्रमुख निर्यातदार देशांपैकी एक झाला आहे. सन २०२४-२५ मधे देशाची संरक्षण सामुग्री निर्यात २३ हजार ६२२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचली. भारत आता अमेरिका, फ्रान्स आणि अर्मेनियासह शंभरहून अधिक देशांना संरक्षण सामुग्रीची निर्यात करतो. यात बुलेट प्रूफ जॅकेट, पेट्रोल बोट, हेलिकॉप्टर्स, रडार इत्यादीचा समावेश आहे. भारत हा संरक्षण सामुग्री निर्यात करणारा जगातला सर्वात मोठा देश करण्याचं उद्दिष्ट असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे.*

\- ***- होल्ड बाईट मोदी - -***

*आत्मनिर्भरतेच्या तत्वावर भारताचं संरक्षण धोरण आधारलेलं आहे. येणाऱ्या काळात संरक्षण क्षेत्र बळकट करून विकसित भारताचं ध्येय साध्य करणं हे सरकारचं उद्दिष्ट आहे.)*

**<><><><>**

स्वदेशनिर्मित अग्नी प्राईम क्षेपणास्त्राची चाचणी यशस्वी झाली आहे. डी आर डी ओ अर्थात संरक्षण संशोधन आणि विकास संस्थेनं विकसित केलेल्या या अत्याधुनिक क्षेपणास्त्राचा पल्ला २ हजार किलोमीटरचा असून रेल्वेमार्गावर चालत्या प्रक्षेपण यंत्रणेद्वारे प्रक्षेपित होणारं हे पहिलंच क्षेपणास्त्र आहे. फिरत्या यंत्रणेमुळे हे क्षेपणास्त्र कोणत्याही प्रकारच्या पृष्ठभागावरून, कमी प्रकाशात आणि त्वरित प्रक्षेपित करता येणार आहे.

संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी ही चाचणी यशस्वी झाल्याबद्दल डी आर डी ओ, स्ट्रॅटेजिक फोर्सेस कमांड आणि सैन्यदलाचं अभिनंदन केलं आहे.

**<><><><>**

वस्तू आणि सेवा करांमध्ये केलेल्या सुधारणा २२ सप्टेंबरपासून लागू झाल्या. याअंतर्गत जीएसटीचा १२ आणि २८ टक्क्यांचा टप्पा रद्द झाला असून फक्त ५ आणि १८

टक्के अशा दोन टप्प्यांमध्येच जीएसटी आकारला जात आहे. यामुळे दैनंदिन वापराच्या अनेक वस्तूंच्या किमती कमी झाल्या आहेत. याविषयी अधिक माहिती जाणून घेऊया....

**- - -व्हीसी - -**

*(वाहतूक पर्यावरणस्नेही आणि परवडण्याजोगे बनवण्यासाठी सरकारनं सायकल उद्योगावरला जीएसटी १२ टक्क्यावरून ५ टक्के केला आहे. यामुळे सायकलचे दर आधीपेक्षा कमी होणार आहेत. विद्यार्थी, तरुण व्यावसायिक आणि फिटनेसची आवड असलेल्या लोकांना सायकल घेणं आता सहज शक्य होणार आहे. अनेक छोट्या व्यावसायिकांसाठी सायकल एक महत्त्वाचं साधन असतं. दर कमी झाल्यामुळे त्यांना सायकल परवडणाऱ्या दरात उपलब्ध होईल तसंच त्यांच्या पैशाची बचतही होणार आहे. विशेषतः ग्रामीण भाग, निमशहरी भागातल्या नागरिकांसाठी सायकलचे दर कमी झाल्यामुळे नव्या संधीची दारं उघडणारं आहेत. शिवाय यामुळे पेट्रोल, डिझेल इंधनाची बचत होऊन पर्यावरण रक्षणालाही हातभार लागणार आहे. सायकलची मागणी वाढल्यामुळे सायकल उत्पादक कंपन्यांनाही मोठा फायदा होणार आहे. सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगाच्या विकासासाठी ही बाब अतिशय महत्त्वाची ठरणार आहे.)*

**<><><><>**

ISSF कनिष्ठ गट विश्वचषक नेमबाजी स्पर्धेत आज महिलांच्या ५० मीटर रायफल प्रोन प्रकारात भारतीय नेमबाजांनी तिन्ही पदकं पटकावली. अनुष्का ठोकूर हिने सुवर्ण पदक, अंशिकाला रौप्य पदक तर आद्या अग्रवालने कास्य पदक जिंकलं. पुरुषांच्या स्पर्धेत भारताच्या दीपेंद्र सिंग शेखावत याने रौप्य पदक तर रोहित कन्यान याने कांस्य पदक जिंकलं.

**<><><><>**

आशिया चषक क्रिकेट स्पर्धेत आज दुबईत बांगलादेश आणि पाकिस्तान यांच्यात सुपर फोर फेरीचा सामना सुरू आहे. बांगलादेशानं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

शेवटची बातमी हाती आली तेव्हा पाकिस्तानच्या दुसऱ्या षटकात १ बाद ४ धावा झाल्या होत्या.

या सामन्यातला विजेता संघ भारताविरुद्ध अंतिम सामना खेळेल. काल झालेल्या सामन्यात बांगलादेशाला नमवून अंतिम फेरीत स्थान निश्चित केलेला भारतीय संघ उद्या संध्याकाळी  श्रीलंकेविरुद्ध सुपर फोर फेरीतला तिसरा सामना खेळणार आहे.

**<><><><>**

जागतिक पातळीवर अनेक आव्हानं आणि अनिश्चित वातावरण असूनही भारताची विकास वाटचाल लक्षणीय असल्याचं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज उत्तरप्रदेशात ग्रेटर नॉयडा इथं आंतरराष्ट्रीय व्यापार मेळ्याचं उद्घाटन करताना बोलत होते. आत्मनिर्भरतेचा मंत्रच भारताला तारून नेईल असं ते म्हणाले.

येत्या सोमवारपर्यंत चालणाऱ्या या मेळ्यात उत्तर प्रदेशातल्या विविध हस्तकला परंपरा, आधुनिक उद्योग, सूक्ष्म लघु आणि मध्यम उद्योग तसंच उदयोन्मुख उद्योजक एकाच व्यासपीठावर एकत्र आले आहेत.)

**<><><><>**

केंद्रीय कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्री शिवराज सिंग चौहान आणि जलशक्ती मंत्री सी आर पाटील यांनी नवी दिल्लीत राष्ट्रीय जल सुरक्षा उपक्रमाचा आरंभ केला. मनरेगाच्या निधीतून होणाऱ्या जलसंधारणाच्या कामांसाठीचा ६५ टक्के निधी हा दुष्काळी आणि दुर्गम भागासाठी राखून ठेवला जाईल तसंच ४० टक्के निधी हा जिरायत भागातल्या कामांसाठी वापरला जाईल असं चौहान यांनी यावेळी सांगितलं.  जलसुरक्षा आणि ग्रामीण विकासाच्या दृष्टीने हे  महत्वाचं पाऊल असल्याचं सी आर पाटील यावेळी म्हणाले.

**//<><><><>//**